# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांकः01.09.2026** **वारःमंगळवार**

---

**ठळक बातम्या**

1. 26व्या शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेला पंतप्रधान नरेंद्र मोदी आज संबोधित करणार.
2. सिंधू जल करार स्थगितच राहील; भारताचा पुनरुच्चार; जागतिक बँकेनं स्थापन केलेल्या लवादाचा निर्णय भारतानं फेटाळला.
3. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत देशाचा GDP ७ पूर्णांक ८ टक्क्यांवर.
4. मणिपूरमधील जनगणना प्रक्रिया पुढं ढकलण्याचा सरकारचा निर्णय.
5. लोकप्रिय फुटबॉलपटू लिओनल मेस्सी याची आंतरराष्ट्रीय फुटबॉल स्पर्धांमधून निवृत्ती.

**पंतप्रधान मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज किर्गिस्तानची राजधानी बिश्केकमध्ये होणाऱ्या 26 व्या शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेला संबोधित करतील. शांघाय सहकार्य संघटनेच्या 25 व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित या परिषदेत चीन आणि रशियासह या संघटनेचे दहा सदस्य देश सहभागी  झाले आहेत. भारत 2017 पासून या शिखर परिषदेचा सदस्य असून आजच्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी सुरक्षा, संपर्क आणि संधी या क्षेत्रांमधील भारताच्या प्राधान्यक्रमांवर प्रकाश टाकतील. दरम्यान, पंतप्रधान मोदी यांनी काल किर्गिस्तानच्या दौऱ्याच्या पहिल्या दिवशी, शांघाय सहकार्य संघटनेतील रशिया, इराण, किर्गिझ प्रजासत्ताक आणि आर्मेनियाच्या नेत्यांशी परस्पर हिताच्या मुद्द्यांवर द्विपक्षीय चर्चा केली.

**सिंधू जल करार**

सिंधू जल कराराबाबत जागतिक बँकेनं स्थापन केलेल्या लवादाचा निर्णय भारतानं  ठामपणे फेटाळून लावला आहे. सिंधू जल करार स्थगितच राहील, या भूमिकेचाही भारतानं पुनरुच्चार केला आहे. जागतिक बँकेतर्फे स्थापन या लवादाचे निर्णय अवैध आहेत, भारतानं या लवाद समितीला कधीही मान्यता दिली नाही, तिच्या कामकाजातही सहभाग घेतला नाही त्यामुळे भारत या लवादाच्या निर्णयांना बांधील नाही, असं परराष्ट्र मंत्रालयानं समाज माध्यमावरील  संदेशात म्हटलं आहे.

भारतानं करार स्थगित करण्यामागे दिलेली कारणे, करार स्थगित किंवा रद्द करण्यास पुरेशी किंवा समर्थनीय नाहीत, असा निर्णय हेग इथल्या लवाद न्यायालयानं दिला आहे, त्यानंतर भारतानं आपली ठाम भूमिका जाहीर केली. 1960 च्या पाणीवाटप करारांतर्गत असलेल्या आपल्या जबाबदाऱ्यांचं पालन सुरू ठेवावं असं आवाहन या समितीनं भारताला केलं होतं. मात्र, भारतानं हा निर्णय फेटाळून लावला. हा लवाद स्थापन करणं हीच करारातील अटींचं उल्लंघन करणारी कृती होती,असा युक्तिवाद भारतानं केला आहे. गेल्या वर्षी एप्रिलमध्ये पहलगाम इथं झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर, भारतानं सिंधू जल करार स्थगित केला आहे.

**G20 अमेरिका**

अमेरिकेतल्या ॲशविले इथं आयोजित G-20 देशांच्या अर्थमंत्री आणि मध्यवर्ती बँकेच्या गव्हर्नर्सच्या दोन दिवसीय बैठकीचा आज अंतिम दिवस आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन या बैठकीत भारतीय शिष्टमंडळाचं नेतृत्व करत आहेत. या बैठकीत जागतिक आर्थिक विकास, आर्थिक स्थिरता, वाढतं कर्ज, व्यापार, गुंतवणूक आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय प्रणालीतील सुधारणा यांवर लक्ष केंद्रित केलं जात आहे. G-20 देशांशी आर्थिक संबंध दृढ करणं आणि देशाला उत्पादन, तंत्रज्ञान आणि नवोपक्रमाचं प्रमुख केंद्र म्हणून सादर करणं हे भारताचं उद्दिष्ट आहे. G-20 नेत्यांची मुख्य शिखर परिषद या वर्षी 14 आणि 15 डिसेंबरला मियामी इथं होणार आहे.

**GDP**

चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनाचा वृद्धी दर 7 पूर्णांक 8 टक्क्यांवर गेला आहे. गेल्या आर्थिक वर्षाच्या याच तिमाहीतील 6 पूर्णांक 9 टक्के GDPच्या तुलनेत यंदाची कामगिरी उल्लेखनीय आहे. तेलाच्या किमतीतील अनियमितता, पुरवठा साखळीतील अडचणी आणि जागतिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवरही देशानं ही वाढ साध्य केल्यानं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाधान व्यक्त केलं आहे.

**भारतीय अर्थव्यवस्था-अमेरिका**

भारताच्या जीडीपीमध्ये 7 पूर्णांक 8 टक्क्यांनी वाढल्याबद्दल अमेरिकेनं भारताची प्रशंसा केली आहे. भारत एक गतिमान, सक्षम आणि लवचिक अर्थव्यवस्था आहे. भारताकडं वेगानं वाढणारी आर्थिक शक्ती म्हणून पाहण्याच्या ट्रम्प प्रशासनाच्या दृष्टिकोनाला या अहवालामुळे दुजोरा मिळाला आहे,असं व्हाईट हाऊसचे वरिष्ठ माध्यम अधिकारी कुश देसाई यांनी एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत म्हटलं आहे. प्रस्तावित भारत-अमेरिका व्यापार कराराच्या वाटाघाटी आता तांत्रिक-स्तरावरील चर्चेच्या टप्प्यावर पोहोचल्या असून या कराराबाबत अमेरिका आशावादी आहे, तसंच भारताशी आर्थिक भागीदारी अधिक दृढ करण्यास उत्सुक आहे, असंही कुश देसाई यांनी सांगितलं.

**मणिपूर-जनगणना**

मणिपूरमधील जनगणना प्रक्रिया पुढं ढकलण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. मणिपूरमधील सध्याच्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत काल झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. दरम्यान, मणिपूर उच्च न्यायालयानं पुढील आदेशापर्यंत मणिपूरमधील जनगणना प्रक्रिया स्थगित ठेवण्याचे निर्देश दिले. दुसरीकडं, एका जनहित याचिकेवर आणि एका स्वतंत्र रिट याचिकेवर सुनावणी करताना, मुख्य न्यायमूर्ती एम. सुंदर आणि न्यायमूर्ती ए. गुनेश्वर शर्मा यांच्या मणिपूर उच्च न्यायालयाच्या विशेष खंडपीठानं मणिपूरमधील जनगणना प्रक्रिया पुढं ढकलण्याचे निर्देश दिले आहेत, या प्रकरणाची पुढील सुनावणी येत्या 12 ऑक्टोबरला निश्चित करण्यात आली आहे.

**जलशक्ती मंत्रालय**

केंद्रीय जल शक्ति मंत्रालयानं आज नवी दिल्लीत विभागीय शिखर परिषदेचं आयोजन केलं आहे. या दोन दिवसीय परिषदेत पायाभूत सुविधा प्रकल्पांची वेळेवर अंमलबजावणी, जल संचयासाठी-लोकसहभाग मोहीम, पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांची शाश्वतता तसंच ग्रामीण पेयजल पुरवठा योजनांची देखभाल आणि दुरुस्ती या चार प्रमुख विषयांवर लक्ष केंद्रित केलं जाईल.

**बेल्जियम पंतप्रधान-भारत दौरा**

बेल्जियमचे पंतप्रधान बार्ट डी वेव्हर उद्यापासून भारताच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यादरम्यान, ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील. तसंच भारत-युरोपियन युनियन मुक्त व्यापार कराराच्या पार्श्वभूमीवर आयोजित एका कार्यक्रमात त्यांचं भाषणही होणार आहे. मुंबई भेटीत ते हिरे, बंदरे आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रातील विविध संबंधितांशी संवाद साधतील. या दौऱ्यामुळं भारत-बेल्जियम यांच्यातील सहकार्य अधिक दृढ करण्याची संधी मिळेल. तसंच, व्यापार, गुंतवणूक, संरक्षण, सुरक्षा, तंत्रज्ञान, अक्षय ऊर्जा आणि संपर्क व्यवस्था यांसारख्या क्षेत्रांमधील सहकार्य देखील वाढीस लागेल,असं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

**भारत जर्मन बैठक**

भारत जर्मन पर्यावरण मंचाची चौथी बैठक आज नवी दिल्लीत होणार आहे. दोन्ही देशांमधलं द्विपक्षीय सहकार्य वाढवणं आणि पर्यावरण तसंच हवामान बदलासंदर्भात देवाणघेवाण सुविधा पुरवणं याविषयी या बैठकीत चर्चा होईल. केंद्रिय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव आणि जर्मनीचे पर्यावरण मंत्री कर्स्टन श्रेडर यांच्या सहअध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीत प्रामुख्यानं पर्यावरण रक्षण आणि हवामान धोरणाबाबत चर्चा होईल.

**एस.आय.आर.**

SIR अर्थात विशेष सखोल पुनरीक्षणाच्या अंतर्गत महाराष्ट्र राज्यातल्या 288 विधानसभा मतदार संघाच्या प्रारुपमतदार याद्या काल प्रसिद्ध झाल्या. राज्याच्या प्रारुप मतदार यादीत 7 कोटी 71 लाख 65 हजार 562 मतदारांचा समावेश आहे. तर 21 टक्क्याहूनअधिक म्हणजेच 2 कोटी 6 लाख 88 हजार 487 मतदारांची नावं वगळण्यात आली आहेत.

**नेपाळ हानी**

नेपाळमध्ये आलेल्या महापुरानंतर बचाव आणिशोधकार्य अजूनही सुरू आहे. आतापर्यंत 939 जणांचे मृतदेहसापडले असून 4,200 पेक्षा जास्त जण अद्यापबेपत्ता आहेत, अशी माहिती नेपाळच्या आपत्ती व्यवस्थापनप्राधिकरणाने दिली आहे.भारतानं नेपाळला बचावकार्यात आणि पीडितांची ओळख पटवण्यात मदत करण्यासाठी विशेष पथकं पाठवली आहेत.

दरम्यान, 403 भारतीय नागरिक चीनमधूनसुरक्षितपणे नेपाळमध्ये पोहोचले असून, 500 भारतीय नागरिक चीनमध्ये सुरक्षित आहेत.

**बिहार-पूर**

नेपाळमधील पूर आणि बिहारमधील नद्यांच्या वाढत्या पाण्याच्या पातळीच्या दरम्यान, प्राणी आणि मत्स्यसंपत्ती विभागानं लोकांना पुराच्या पाण्यातून पकडलेल्या माशांचं सेवन न करण्याचा सल्ला दिला आहे.पुराच्या वेळी, मासे सांडपाणी, मृत प्राणी आणि इतर दूषित पदार्थांच्या संपर्कात येऊ शकतात, ज्यामुळं जीवाणू, विषाणू आणि इतर रोगजनुकांमुळं दूषित होण्याचा धोका वाढतो आणि अशा माशांचं सेवन आरोग्यास हानीकारक ठरू शकतं,त्यामुळं पुराचं पाणी स्थिर होईपर्यंत पुराच्या पाण्यातून पकडलेले मासे खाण्यासाठी वापरू नयेतअसं विभागानं स्पष्ट केलं आहे.

**मेस्सी निवृत्ती**

अर्जेंटिनाचा ख्यातनाम फुटबॉलपटू लिओनल मेस्सी यानं आंतरराष्ट्रीय फुटबॉल स्पर्धांमधून निवृत्ती जाहीर केली आहे. फुटबॉल विश्वचषक स्पर्धेतल्या अंतिम फेरीतील पराभवानंतर निवृत्तीचा निर्णय घेतल्याचं मेस्सीनं समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. आपल्या 20 वर्षांच्या कारकीर्दित मेस्सीनं अर्जेंटिनाला 2022 मध्ये विश्वविजेतेपद तर दोन वेळा कोपा अमेरिका स्पर्धेचं विजेतेपद मिळवून दिलं.

**युपी आग**

उत्तर प्रदेशात कौशाम्बी इथं फटाक्याच्या कारखान्याला लागलेल्या आगीत 11 जणांचा मृत्यू झाला असून 5 जण गंभीर जखमी झाले आहेत. मृतांमध्ये 2 बालकांचा समावेश आहे. आगीमुळे आसपासच्या किमान पाच घरांचंही नुकसान झालं आहे. या घटनेची चौकशी करण्यात येत असून सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राष्ट्रपती आणि पंतप्रधानांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. मृतांच्या कुटुंबीयांना 2 लाख रुपये तर जखमींना 50 हजार रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे.

**हवामान**

हवामान विभागानं आज छत्तीसगडमध्ये अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. तसंच हिमाचल प्रदेश, बिहार, पूर्व मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, झारखंड, ओडिशा, उत्तराखंड आणि ईशान्य भारतातील काही भागांतही आज मुसळधार पावसाची शक्यता आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.